# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## नोंदणीकृत पदवीधर यादीत व पदवीधर मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करण्यासाठी जाहीर विज्ञापन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये अधिसभेवर पदवीधर मतदार संघातून निवडून द्यावयाच्या १० जागांसाठी पदवीधर मतदार यादी तयार करावयाची आहे. यापूर्वीच्या महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ९९ नुसार **ज्या पदवीधरांची नावे विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या यादीत आहेत, त्यांनी पुन्हा पदवीधर नोंदणी करण्याची आवश्यकता नाही.** तसेच **ज्या नोंदणीकृत पदवीधरांनी दि.२६/६/२०१५ ते दि.३०/७/२०१५ या कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी केली आहे, अशा पदवीधरांनी पुन्हा पदवीधर मतदार नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. तथापि नोंदणीकृत पदवीधर यादीतील ज्या पदवीधरांनी सदर कालावधीत पदवीधर मतदार नोंदणी केली नसेल त्यांना पदवीधर मतदार नोंदणी करता येईल.**

या व्यतिरिक्त शिवाजी विद्यापीठाचे जे पदवीधर नांव नोंदवू इच्छितात, त्यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३१ नुसार नोंदणीकृत पदवीधर यादीत व पदवीधर मतदार यादीत नाव नोंदविणे आवश्यक आहे.

जे पदवीधर आपले नाव नोंदणीकृत पदवीधर यादी व पदवीधर मतदार यादीमध्ये नोंदविणार नाहीत, त्यांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. पदवीधर मतदार यादीत नांव नोंदविण्यासाठी संकेतस्थळावरील मतदान केंद्राची यादी पाहणेची आहे.

- **महत्वाची सूचना :** पदवीधरांनी मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यासाठी आपला अर्ज फक्त ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. **ऑनलाईन पध्दतीने अर्ज न भरलेल्या अर्जदारांची नावे कोणत्याही परिस्थितीत यादीत समाविष्ट केली जाणार नाहीत. अर्ज भरण्यापूर्वी संकेतस्थळावर ठेवलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.**

ज्यांना या नोंदणीकृत पदवीधर यादीत व पदवीधर मतदार यादीत नाव नोंदणी करावयाची आहे, त्यांनी शुल्क रू.२०/- ऑनलाईन पद्धतीने भरून विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून खालीलप्रमाणे नोंदणी प्रक्रिया **दि.२५ जून, २०१७ पूर्वी** पूर्ण करावी. शासन निर्देशानुसार शुल्क कोणत्याही परिस्थितीत रोखीने स्विकारले जाणार नाही.

**संकेतस्थळावर अर्ज भरण्याची पध्दत :**

सदरचा अर्ज पदवीधरांनी विद्यापीठाच्या unishivaji.ac.in या संकेतस्थळावर University Election 2017 या लिंकवर भरावा. संपूर्ण ऑनलाइन भरलेल्या अर्जाची A4 Size कागदावर प्रिंट घेऊन अर्ज खाली नमुद केलेल्या कागदपत्रासह विद्यापीठाकडे पाठवावा, अन्यथा आपण संकेतस्थळावर केलेली नांव नोंदणी, नोंदणी यादीत समाविष्ट केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. अधिक माहितीकरिता विद्यापीठाच्या टेलिफोन नं. ०२३१-२६०९१३० / ०२३१-२६०९१२९ वर संपर्क साधावा.

निवडणूका विविध मतदान केंद्रावर घेण्यात येणार असल्याने, मतदार नोंदणी अर्जामध्ये ज्या मतदान केंद्रावर मतदान करणार त्याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे. मतदान केंद्राची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवली असून निवडलेल्या केंद्रावरच मतदारांना मतदान करण्याचा हक्क राहील. एकदा मतदान केंद्र निश्चित केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही.

- **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे:**
  १. पदवी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
  २. निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणुक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा.
  ३. शुल्क भरलेली पावती
- **अर्ज कोठे पाठवावा :** उपरोक्त कागदपत्रासह अर्ज प्रति, मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४ यांचे नावे पोष्टाने अथवा समक्ष मुख्य प्रशासकीय इमारत खोली क्र. १३८ मध्ये **दिनांक २७ जून, २०१७ पर्यंत** किंवा त्यापूर्वी जमा करावा.

कोल्हापूर
दिनांक : ०१.०६.२०१७

**डॉ.व्ही.डी.नांदवडेकर**
कुलसचिव